**शिक्षणासोबत कौशल्यविकास आवश्यक- एकनाथराव खडसेरविवार, ०७ फेब्रुवारी, २०१६**

**गुणवंत पाल्यांचा सत्कार**

जळगाव : विद्यार्थ्यांना केवळ कारकुनी शिक्षण देऊन उपयोग नाही. शिक्षणानंतर त्यांना रोजगार मिळावा यासाठी त्यांच्यातील कौशल्यांचा विकास करणे आवश्यक आहे. त्यासाठी शासनाने विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासावर भर दिला आहे. या निर्णयामुळे नवीन पिढी सक्षम होणार असून शिक्षकांनीही या नवीन दृष्टिकोनाचा अंगिकार करावा, असे आवाहन पालकमंत्री एकनाथराव खडसे यांनी येथे केले.

येथील जळगाव जिल्हा माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर नोकरांची नागरी सहकारी पतपेढी मार्फत गुणवंत पाल्यांच्या सत्कार कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. येथील सरदार वल्लभभाई पटेल लेवा भवन येथे हा सोहळा पार पडला. यावेळी खासदार ए. टी. नाना पाटील, जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या चेअरमन रोहीणीताई खडसे-खेवलकर, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था संजय राऊत, जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) देविदास महाजन,विष्णू भंगाळे, संस्थेचे अध्यक्ष शालीग्राम भिरुड, उपाध्यक्ष हेमंत चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी श्री.खडसे यांच्या हस्ते संस्थेच्या सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलतांना श्री.खडसे म्हणाले, आपल्या पाल्याने केलेल्या चांगल्या कामगिरीबद्दल, त्याने मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचे कौतुक केले पाहिजे. त्यामुळे त्याला अधिक चांगली वाटचाल करण्यासाठी प्रोत्साहन मिळते. कोणत्याही क्षेत्रात विद्यार्थ्याने प्रावीण्य मिळविले म्हणजे त्याला प्रोत्साहन दिले पाहिजे. हे काम जळगाव जिल्हा माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर नोकरांची नागरी सहकारी पतपेढी करते याबद्दल श्री.खडसे यांनी संस्थेचे कौतुक केले. शिक्षकांसंदर्भातील अन्याय दूर व्हावा यासाठी कायम विनाअनुदानीत शाळांना अनुदानावर आणण्याचाही शासनाने निर्णय घेतला आहे.

शासनाने शिक्षणासंदर्भात घेतलेल्या निर्णयांची माहिती देतांना ते म्हणाले, दहावी नापास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये म्हणून शासनाने नापास विद्यार्थ्यांना लगेच एकच महिन्यात पुन्हा परीक्षेची संधी दिली. त्यात 65 हजार विद्यार्थी पास झाले आणि त्यांचे वर्ष वाया जाण्यापासून वाचवले. शिक्षणासोबत कौशल्य विकासावर शासनाचा भर असल्याचे सांगून ते म्हणाले, कौशल्य विकासातून लोकांना सेवा पुरवण्याचा उद्योग करणाऱ्यांना शासनाचे मदतीचे धोरण आहे. त्यासाठी मुद्रा बँकेमार्फत 10 लाख रुपयांपर्यंत विनातारण कर्ज देण्याची योजना केंद्र शासनाने आणली आहे. त्याचा फायदा घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. या कार्यक्रमाला संस्थेचे सभासद, त्यांचे पाल्य तसेच सर्व पदाधिकारी, संचालक आदी उपस्थित होते.